**प्रेसनोट दि. १६.१०.२०२०**

श्री. प्रविणकुमार हणमंत तुपे वय ५७ वर्ष, सहाय्यक पोलीस फौजदार,तासगांव पोलीस ठाणे यांना १०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचेवर तक्रारदार यांचे गावातील इसमाने चोरी केल्याचा आळ घेतला होता तसेच सदर प्रकरणात तक्रारदार यांना मारहान करण्यात आली होती. सदर प्रकरणात तक्रारदार यांचेवर चोरीचा आळ असल्याने तासगांव पोलीस ठाणेमधील सहाय्यक पालीस फौजदार श्री. तुपे यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरूध्द चोरीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता व त्यांना आरोपी न करण्यारीता तक्रारदार यांचेकडे २०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.१२.१०.२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १३.१०.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये सहाय्यक पोलीस फौजदार श्री. तुपे यांनी तक्रारदार यांचे विरूध्द गुन्हा दाखल न करण्याकरीता व आरोपी न करण्याकरता तक्रारदार यांचेकडे प्रथम २०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज रोजी तासगांव पोलीस ठाणे या ठिकाणी सापळा लावला असता श्री. प्रविणकुमार हणमंत तुपे, सहाय्यक पोलीस फौजदार,तासगांव पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. प्रविणकुमार हणमंत तुपे वय ५७ वर्ष, सहाय्यक पोलीस फौजदार,तासगांव पोलीस ठाणे रा. भवाणीमळा, भवाणीमंदीरा जवळ, विटा ता.खानापूर जि. सांगली यांचे विरुध्द तासगांव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. सुहास नाडगोडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, प्रितम चौगुले, सलोम मकानदार, अविनाश सागर, सुहेल मुल्ला, संजय संकपाळ,रविंद्र धुमाळ, भास्कर भोरे, सिमा माने, राधीका माने,चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in